# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरात संपन्न होणाऱ्या G-२० परिषदेच्या अनुषंगाने प्रामुख्याने विमानतळ
**{विद्युत विभाग}** ते रहाटे चौक, पाम रोड, रामगिरी वाकर रोड ते फुटाळा तलावापर्यंतच्या रस्त्यावर व इतर महत्वाच्या ठिकाणी अस्थायी प्रकाश व्यवस्था करणेचे गरजेचे आहे. तात्पुरती प्रकाश व्यवस्था करण्याकरीता कामात लागणाऱ्या बाबींचे आयटम रेट निविदा बोलावून दर निश्चित करण्याचा प्रश्न विचारात घेणे. दर निश्चित झाल्यावर मंजूर दरानुसार कामात आवश्यकतेनुसार कामाचे प्राकलन तयार करुन तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर कामे हाती घेण्याचा प्रश्न विचारात घेणे. सदर कामाचा खर्च पद क्र. A४०२००४४०७०६ अंतर्गत बचतीच्या राशीतून करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामाचा खर्च प्राथमिक रु. २.५ कोटी पर्यंत सिमित राहिल.

**टिप** :- १) सदर कामाचा खर्च पद क्र. A४०२००४४०७०६ अंतर्गत करावयाचा आहे.
२) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 305/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 03/03/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात संपन्न होणाऱ्या G-२० परिषदेच्या अनुषंगाने प्रामुख्याने विमानतळ ते रहाटे चौक, पाम रोड, रामगिरी वाकर रोड ते फुटाळा तलावापर्यंतच्या रस्त्यावर व इतर महत्वाच्या ठिकाणी अस्थायी प्रकाश व्यवस्था करणेचे गरजेचे आहे. तात्पुरती प्रकाश व्यवस्था करण्याकरीता कामात लागणाऱ्या बाबींचे आयटम रेट निविदा बोलावून दर निश्चित करण्याचा प्रश्न विचारात घेऊन, (सदर कामाचा खर्च पद क्र. A४०२००४४०७०६ अंतर्गत बचतीच्या राशीतून करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामाचा खर्च प्राथमिक रु. २.५ कोटी पर्यंत सिमित राहिल.) दर निश्चित झाल्यावर मंजूर दरानुसार कामात आवश्यकतेनुसार कामाचे प्राकलन तयार करुन तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर कामे हाती घेण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**